प्रेसनोट

दिनांक ०८/०७/२०२५

# अँन्टी करप्शन विभाग, नवी मुंबई यांची यशस्वी सापळा कारवाई

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विभाग/घटक | :- | अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| २. | ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक . | :- | पेण पोलीस ठाणे, जि.रायगड पोलीस ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक ४६/२०२५ वेळ १९:२१, दिनांक ०८/०७/२०२५ |
| ३ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | | संजय प्रदीप जाधव, वय ५३ वर्षे, उप कार्यकारी अभियंता, (वर्ग-२) म.रा.वि.वि.कं.लि., पेण सर्कल, जि.रायगड, |
| ४. | लाचेची मागणी रक्कम | :- | रु. ५,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी |
| ५ | स्विकारलेली रक्कम | :- | ५,०००/- रुपये |
| ६ | थोडक्यात हकिगत | :- | खालापूर ता.खालापुर, जि. रायगड येथील एका इसमाचे मालकीचे जागेमधून महावितरण विभागाचे इलेक्ट्रीक उच्चदाबाच्या ३ वाहिन्या गेलेल्या असुन सदरच्या वाहिन्या या एका जागेवरुन दुस-या जागेवर स्थलांतरीत करण्याकरीता जागा मालक यांनी तकारदार यांचे पत्नीचे नावे असलेल्या मे. शाक्य ईंटरप्रायसजेस, या कंपनीस काम दिले होते. सदर काम करुन घेण्याबाबतचे अधिकारपत्र मे. शाक्य ईंटरप्रायसजेस च्या वतीने तकारदार यांना दिले होते. सदर कामाचा तांत्रिक परवाना पेण म.रा.वि.वि. कं.लि पेण सर्कल, जि.रायगड या कार्यालयात प्रलंबित होता. सदर परवाना लवकरात लवकर मिळण्याकरिता तकारदार यांनी जागा मालक यांचे वतीने सदर कार्यालयातील लोकसेवक उप कार्यकारी अधिकारी, श्री संजय प्रदीप जाधव यांना भेटून सदर कामाचा तांत्रिक परवाना लवकरात लवकर मिळण्याकरीता विनंती करुन अर्ज सादर केला होता. सदर तांत्रिक परवाना देणेकरीता लोकसेवक यांनी तकारदार यांचेकडे रू. ५,०००/- इतक्या लाचेच्या रकमेची मागणी केली होती. सदरबाबत तकारदार यांनी दि. ०७/०७/२०२५ रोजी अँन्टी करप्शन ब्यूरो, नवी मुंबई कार्यालयात समक्ष तकार दिली होती.<br>सदर तकारीचे अनूषंगाने शासकीय पंचासमक्ष दि. ०८/०७/२०२५ रोजी केलेल्या लाचेच्या सत्यता पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तकारदार यांचेकडे प्रलंबित कामची पुर्तता करून देणेकामी रू. ५,०००/- इतक्या लाचेच्या रकमेची मागणी केल्याचे निषन्न झाले आहे. त्यानंतर आयोजित सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक संजय प्रदीप जाधव, उप कार्यकारी अभियंता यांनी म.रा.वि.वि.कं.लि., पेण सर्कल कार्यालयात तकारदार यांचेकडुन रू.५,०००/- लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना सापळा पथकाने १५:३५ वा. रंगेहात पकडेले अ हे. लोकसेवक संजय जाधव यांना ताब्यात घेवून त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंद करण्याची कारवाई सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंध विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरुध्द तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

मार्गदर्शन अधिकारी:- मा.श्री.शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

मा. श्री. संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

मा.श्री. सुहास शिंदि, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

संपर्क पत्ता :-ला.प्र.वि. नवी मुंबई मध्यवर्ती सुविधा इमारत फळमार्केट, तुर्भे, से.न.१९, एपीएमसी नवी मुंबई, ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१

संकेत स्थळ :-acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई-मेल :- spacbthane@mahapolice.gov.in,

ऑनलाईन तक्रार अ‍ॅप्लीकेशन :-acbmaharashtra.net

टोल फ्रीनं. :-१०६४ दुरध्वनी क्र. :-०२२-२०८१३५९८/२०८१३५९९

असीबी, नवी मुंबई कार्यालय दुरध्वनी क्र. -२७८३३३४४/७०६६६३५६६६

व्हॉटस्‌अ‍ॅप क्र. :-९९३०९९७७००

( किरणकुमार नामदेव वाघ
पोलीस निरीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो. नवी मुंबई